संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगांव व्दारा संचालीत

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.

पदवी वितरण समारंभ अहवाल

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे दि.०२ ऑगस्ट २०२३ रोजी विद्यापीठाने निर्देशित केल्यानुसार दिक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ.नारायणराव गोटे हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.संतोष कुटे (सिनेट सदस्य, सं.गा.बा.अ.वि. अमरावती तथा अर्थशास्त्र विभागप्रमुख, श्रीमती सिंधुताई जाधव महाविद्यालय, मेहकर) व डॉ.विजय जाधव (सदस्य मराठी अभ्यास मंडळ, सं.गा.बा.अ.वि. अमरावती तथा, प्राध्यापक, मराठी विभाग, राजस्थान आर्य महाविद्यालय, वाशिम.) हे होते. तर प्रमुख उपस्थितांमध्ये प्रा.सुमीत गोटे, प्राचार्य डॉ.बी.आर. तनपुरे, डॉ.जी.एस.कुबडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. आपल्या प्रस्ताविकामध्ये डॉ.दिपक दामोदर यांनी पदवी वितरण समारंभाच्या आयोजनामागील विद्यापीठाचा उद्देदश स्पष्ट केला. याप्रसंगी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकुण ७५ विद्यार्थ्यांना सन्मानपूर्वक पदवी वितरीत करण्यात आली.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.संतोष कुटे यांनी विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त करणे मग ती कुठल्याही शाखेची असो निश्चीतच कौतुकास्पद बाब असल्याचे म्हटले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कला कौशल्य तथा अंगीभूत गुणांच्या आधारे वेगवेगळया क्षेत्रात पुढे जाण्याचे आवाहन केले. डॉ.विजय जाधव यांनी परिश्रमाला पर्याय नाही, परिश्रम हाच यशाचा मुख्य व अंतिम मार्ग आहे हे पटवून दिले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आर.तनपुरे व डॉ.जी.एस.कुबडे यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ.नारायणराव गोटे यांनी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच आपल्या पदवीचा उपयोग स्वतासह समाजासाठी करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.वैष्णवी ठाकरे हिने केले तर आभार प्रदर्शन कु.विजया खंडारे हिने केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

मान्यवरांच्या हस्ते पदवी स्विकारतांना पदवीकांक्षी विद्यार्थी

मान्यवरांच्या हस्ते पदवी स्विकारतांना पदवीकांक्षी विद्यार्थी

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

मान्यवरांच्या हस्ते पदवी स्विकारतांना पदवीकांक्षी विद्यार्थी

पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.नारायणराव गोटे

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ.संतोष कुटे सोबत इतर मान्यवर

पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ.विजय जाधव सोबत इतर मान्यवर

पदवी वितरण कार्यक्रमाची बातमी

देशोन्नती

मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात पदवीदान समारंभ

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम ■ मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात २ ऑगस्ट ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या निर्देशानुसार पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवीदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. संतोष कुटे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती मराठी अभ्यास

मंडळाचे सदस्य डॉ. विजय जाधव, सुमित गोटे, प्राचार्य डॉ.बी. आर. तनपुरे डॉ. जी. एस. कुबडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनात कुठल्या शाखेची पदवी प्राप्त करणे हे विद्यार्थ्यांसाठी मोठ्या कौतुकाचे बाब असते. तेथूनच पुढे त्यांच्या खरे आयुष्याला सुरुवात होत असते. प्रत्येक विद्यार्थी आपल्या कला कौशल्यानुसार वेगवेगळे क्षेत्र निवडत असतो. निवडलेल्या क्षेत्रात पूर्ण योगदान देणे हे विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे असते. आजचा विद्यार्थी उद्याचा देशाचा आधारस्तंभ असतो तो देशाला मोठ्या प्रगतीकडे नेऊ शकतो. देशाचा विकास हा युवाशक्ती मध्येच असतो त्यामुळे समाजाला प्रेरणा मिळेल असे कार्य युवकांनी विद्यार्थी जीवनामध्ये करायला पाहिजे. केवळ पुस्तकी ज्ञान मिळून विद्यार्थी हा मोठा होत नसतो. समाजासाठी देशासाठी त्यांनी काय योगदान दिले यातूनच तो खऱ्या अर्थाने मोठा म्हणत असतो विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील नॉलेज घेऊन आपला विकास साधण्याचे आव्हान याप्रसंगी त्यांनी केले. मान्यवराच्या हस्ते कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकूण ७५ विद्यार्थ्यांना पदव्या देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. आर. दामोदर यांनी केले. संचालन कु. वैष्णवी वानखेडे हिने केले तर उपस्थितांचे आभार कु. विजया खंडारे हिने मानले. सदर कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. (ता.प्र.)

Deshonnati Edition
Aug 3, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

दैनिक लोकन्याय संघर्ष
गुरुवार 3 ऑगस्ट 2023
६

मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात

वाशिम तालुका प्रतिनिधी : मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात दि. 2 ऑगस्ट 2023 ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या निर्देशानुसार पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवीदान करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. नारायणराव गोटे हे होते.

प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. संतोष कुटे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. विजय जाधव, सुमित गोटे, प्राचार्य डॉ.बी. आर. तनपुरे डॉ. जी. एस. कुबडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनात कुठल्या शाखेची पदवी प्राप्त करणे हे विद्यार्थ्यांसाठी मोठ्या कौतुकाचे बाब असते. तेथूनच पुढे त्यांच्या खरे आयुष्याला सुरुवात होत असते. प्रत्येक विद्यार्थी आपल्या कला कौशल्यानुसार वेगवेगळे क्षेत्र निवडत असतो. निवडलेल्या क्षेत्रात पूर्ण योगदान देणे हे विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे असते. आजचा विद्यार्थी उद्याचा देशाचा आधारस्तंभ असतो तो देशाला मोठ्या प्रगतीकडे नेऊ शकतो. देशाचा विकास हा युवाशक्ती मध्येच असतो त्यामुळे समाजाला प्रेरणा मिळेल असे कार्य युवकांनी विद्यार्थी जीवनामध्ये करायला पाहिजे. केवळ पुस्तकी ज्ञान मिळून विद्यार्थी हा मोठा होत नसतो. समाजासाठी देशासाठी त्यांनी काय योगदान दिले यातूनच तो खऱ्या अर्थाने मोठा म्हणत असतो विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील नॉलेज घेऊन आपला विकास साधण्याचे आव्हान याप्रसंगी त्यांनी केले. मान्यवराच्या हस्ते कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकूण 75 विद्यार्थ्यांना पदव्या देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. आर. दामोदर यांनी केले. संचालन कु. वैष्णवी वानखेडे हिने केले तर उपस्थितांचे आभार कु. विजया खंडारे हिने मानले. सदर कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

लोकन्याय संघर्ष
प्रदीप पट्टेबहादूर
सामाजिक बातमी